# पाठवणी

Page No.:
Date:
YOUVA

मुली, आज ही पाठवणी लिहिण्यास घेतली आणि आठवणींच्या हिंदोळ्यात बसून तुझ्या जन्मापासूनच्या आठवणीत मन भिरभिरू लागलं.

काल ची तळहातावर खेळवलेली आमची लेक आज लग्न करण्याइतकी मोठी झाली? मायेच्या पंखाखाली चिवचिवणारी आमची चिमणी संसाराच्या प्रांगणात झेप घेण्यासाठी पंख फडफडवू लागली? इतकी मोठी गरुडझेप घेण्याइतकी मोठी झाली माझी लेक? नाही...! अजून तू एवढी मोठी झालीस असं वाटतच नाही. रुसणारी, फुगणारी, भांडणारी, हट्ट करणारी चिमुरडी तू! किती थोड्या काळात फुलपाखरू झालीस ग! काल ची परकरात फिरणारी आमची लेक आता साडीच्या शेव सावरीत दमदार पावले टाकू लागली आहे नव्हे सप्तपदीच्या वेदीवर चढण्यासाठी पदर खोचून तयार झालीस. पण सगळं अटळ आहे. आम्ही तुझी पाठवणी करीत आहोत. तुम्ही उभयता संसाराच्या सारीपटावर "औक्षवंत व्हा। यशवंत व्हा!!" या आशीर्वादाने तुला सुयश चिंतून तुला थोडा उपदेशही करीत आहोत.

आज तुझ्या सौभाग्याची सुरवात होत आहे. संसाराची तुझी सोनेरी स्वप्ने साकार करताना तुझ्या संसारातील कुटुंबियांना मायेने, आपलेपणाने जवळ कर. तुझे पती तुझे सारे सर्वस्व आहे. अहंकाराला मुरड घालून 'क्षणाची पत्नी व अनंतकाळची माता बन.' ज्या परमेश्वराने तुला हे सौख्य दिले त्याला कधीही विसरू नकोस, त्या देवघराशीच तुला निरोप देत आहे. निसर्गाला गुरु करून अनंताकडे सुखानंद वाटचाल कर. आमची सुसंस्काराची शिदोरी जतन कर. पतिसमवेत संसाराची वाट चालताना मागे डोकावून बघ. त्या क्षणासाठी आम्ही डोळे भरून तुला नेत्रांत साठवून ठेवत आहोत.

जा, सुखी भव!

सौ. अनघा आपटे
सोलापूर 413
mb. 9146398897

**व्हिडिओ पहा**